
आदिदिशा सिड्स
खेती की नई दिशा

# फुले समर्थ

(महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे नविन संशोधित वाण.)




## * वाणाची वैशिष्ट्ये :

१. हंगाम : खरीप/रांगडा

२. रंग : आकर्षक गोलाकार गडद लाल रंगाचे चमकदार कांदे

३. टिकवन क्षमता : २-३ महिन्यापर्यंत साठवणूकीसाठी उत्तम डबल पत्ती वाण.

४. काढणी : खरीपात ९० ते १०० दिवसात परिपक्वता.

५. नैसर्गिकपणे माना पडतात, कांद्याची मान बारीक.

६. उत्पन्नासोबत बाजारात हमखास फायदा मिळवून देणारा वाण.


## Aadidisha Seeds Pvt. Ltd.

**Official Address:** Plot No. 50, S.N. 49/2A, Lekha Nagar, Ekvira Chowk, Pipeline Road, Ahilyanagar, Maharashtra 414003

**Customer Care No.:** 8055122298 | 8975304910

**Email:** info@aadidishaseeds.com

**Website:** www.aadidishaseeds.com

आदिदिशा सिड्स
खेती की नई दिशा

# कांदा लागवड तंत्रज्ञान । वाण : फुले समर्थ

**१. जमीन / पूर्व मशागत :** मध्यम काळी, पाण्याचा चांगला निचरा होणारी, सामू ७ ते ८.२५ असावा. एक खोल नांगरट देऊन कुळवाच्या उभ्या आडव्या दोन पाळ्या द्याव्यात.

**२. लागवड हंगाम:** खरीप : जुनचा पहिला पंधरवडा, रांगडा : जुलैचा दुसऱ्या पंधरवाडा ते ऑगस्ट पहिला पंधरवडा दरम्यान रोपवाटिका करावी.

**३. रोपवाटीका तयार करणे :** कांद्याच्या लागवडीसाठी प्रथम रोपवाटीकेत रोपे तयार करून त्यांची पूनर्लागण करावी, रोपवाटीकेसाठी जमीन भूसभूशीत व निच-याची असावी, वाफे तयार करण्यासाठी जमीन नांगरावी. पावसाळी हंगामात शक्यतो ३ मी लांब व २ मी रुंद व उंची १५ सेंमी चा गादीवाफा करावा. वाफे तयार करण्यापूर्वी त्यामध्ये चांगले कुजलेले शेणखत २-३ घमेली, ५० ग्रॅम सुफला मिसळुन द्यावा, रोपवाटीकेत रोग व किडीचा प्रादुर्भाव होऊ नये जमीनीत प्रती चौ. मीटरला ३ ग्रॅम थायरम किंवा कॅप्टान किंवा ट्रायकोडर्मा मिसळावे, १ हेक्टर लागवडीसाठी १२-१५ गुंठे क्षेत्रातील रोपे पुरेसे होतात.

**४. बियाण्यांचे प्रमाण व प्रक्रिया :** बियाणाची उगवण क्षमता उत्तम असल्यास हेक्टरी लागवडीसाठी ८ ते १० किलो बियाणे पुरेसे होते, पेरणीपूर्वी थायरम किंया कार्बोन्डॅझीम २ ग्रॅम प्रती किलो या प्रमाणात बियाणास चोळावे, बियाणे पेरताना दोन ओळीत ५ से.मी. अंतर ठेवावे व पेरणीनंतर लगेच पाणी द्यावे.

**५. रोपांची निगा :** कोरड्या हवामानात सकाळी किंवा संध्याकाळी पाणी द्यावे, रोप उगवून आल्यानंतर १०-१५ दिवसांनी २५-३० ग्रॅम प्रती वाफ्यास थिमेट किंवा फोरेट द्यावे, तण काढून किंवा तणनाशक फवारणी करून वाफे स्वच्छ ठेवावे, रोपे वाढू लागल्यास १०-१५ दिवसाच्या अंतराने रोग व किडीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून १० लिटर पाण्यातून किडनाशक रोगोर १५ मिली व डायथेन एम-४५, २५ ग्रॅम मिसळून फवारणी करावी, रोपे लागवडीस ७-८ आठवड्यात तयार होतात, रोपे लागवडीस काढणी अगोदर ७-८ दिवस पाणी तोडावे म्हणजे रोपे काटक होतात.

**६. कांदा लागवड :** लागवड सरी वरंब्यावर करता येते. तसेच ठिबक सिंचनासाठी लागवड लांब तयार केलेल्या गादी वाफ्यावर करावी, रोपे लागवड १५१० सेमी. अंतरावर करावी, रोपे लागवडीपूर्वी रोग व किडीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून १० लिटर पाण्यातून रोगोर १५-२० मिली व डायथेन एम-४५, २५ ग्रॅम किंवा कार्बोन्डॅझीम १० ग्रॅम यांच्या मिश्रणातून रोपे ५ मिनिटे बुडवून लावावीत.

**७. खत व्यवस्थापन :** खरीप हंगामासाठी अपेक्षीत उत्पन्नासाठी प्रती हेक्टरी २० टन शेणखत, १००:५०:५० किलो नत्र, स्फुरद व पालाश या खतांच्या मात्रा द्याव्यात. नत्राची अर्धी व स्फुरद व पालशची संपूर्ण मात्रा लागवडीच्या वेळेस द्यावी व उरलेली नत्राची अर्धी मात्रा विभागून दोन वेळेस द्यावी. तसेच जमिनीत मुक्त चुन्याचे प्रमाण ८ टक्केपेक्षा जास्त असेल तर ३०-४० किलो सल्फर, १५-२० किलो फेरस सल्फेट + १० किलो झिंक सल्फेट, प्रती हेक्टरी जमिनीतून मिसळून द्यावे. तसेच मिश्र सुक्ष्मअन्न
द्रव्याची १० लिटर पाण्यातून २५-३० ग्रॅम मिसळून फवारणी करावी.

**८. तण नियंत्रण :** लागवडी अगोदर बासालीन (फ्लुक्लोरालिन) २.५ मिली प्रती लिटर पाण्यातून जमिनीवर फवारणी करावी लागवडीनंतर २१ ते २५ दिवसांनी ऑक्झिफ्ल्युरोफेन (गोल) २३.५% ईसी १० मिली प्रति १० लिटर किंवा टरगा सुपर १५ मिली व ऑक्झिफ्ल्युरोफेन (गोल) १० मिली प्रती १० लिटर पाण्यातुन फवारणी करावी वरील तणनाशकाची फवारणी केल्यास ४०-५० दिवसापर्यंत शेत तण विरहीत राहते व नंतर एक खुरपणी द्यावी म्हणजे तणाची वाढ नियंत्रित राहुन उत्पादनात वाढ होते.

**९. रोग व किड नियंत्रण (तुडतुडे, मावा, थ्रीप्स, जांभळा करपा आणि तपकिरी करपा):** फुलकिडे : पिले आणि प्रौढ पाने खरवडतात आणि त्यातून बाहेर येणारा रस शोषतात. त्यामुळे पानांवर पांढरे चट्टे पडतात यालाच टाक्या असे संबोधतात. त्याच्या नियंत्रणासाठी टोलफेनपायरॅड १५ ई.सी.२ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन ११ ई.सी. ३ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हातपंपाने या किटकनाशकांच्या आलटुन पालटून फवारण्या कराव्यात. अधून मधून ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी. फवारणी करतांना चिकट द्रव्याचा (०.१%) वापर जरूर करावा. करपा रोग : डायफेनकोनॅझोल २५% ई.सी.१० मि.ली. १० लिटर पाण्यात किंवा टेब्युकोनॅझोल २५.९ टक्के ई.सी. १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा ॲझोक्सिस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा ॲझोक्सिस्ट्रोबीन ११% + टेब्युकोनॅझोल १८.३% १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात किंवा किटाझिन ४८% इ.सी. १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यातून १० दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारावेत. (किटकनाशक व बुरशीनाशकाचे प्रमाण १० लि. पाण्यासाठी दिले आहे.)

**१०. पाणी व्यवस्थापन :** खरीप हंगामात गरजेनुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात व रांगडा हंगामात १०-१२ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे, ठिबक सिंचन, तुषार सिंचन या पद्धतीने काद्याचा आकार वाढतो व निर्यातक्षम कांद्याचे उत्पन्न वाढते, सुधारीत सिंचनाची पद्धतीने पारंपारीक पद्धतीपेक्षा दुप्पट क्षेत्रास पाणी देता येते, तुषार व ठिबक सिंचन पद्धतीत ४० टक्केपर्यंत पाण्याची बचत होऊन २५-३० टक्के उत्पादन वाढते.

**११. कांदा काढणीस तयार झाल्याची लक्षणे :** कांदा पक्व झाला म्हणजे नवीन पाने येण्याचे थांबते, पातीतील अन्नरस कांद्यात उतरून कांदा वजनदार होऊ लागतो, कांद्याची पात पिवळसर होते, व पातीचा जाडसर भाग मऊ पडून पात कोलमडते यालाच माना मोडणे म्हणतात. कांद्याची बुडाशी घट्ट असलेली मुळे सुकून जमिनीची पकड सैल पडत, ५० टक्के माना पडल्या म्हणजे कांदा काढावा. शेतात कांदा सुकविल्यानंतदर ३-४ सें. मी. मानेचा भाग ठेवून पात कापावी म्हणजे कांद्याला साठवणीत मोड येत नाही.

**१२. वाणाची वैशिष्ट्ये :** आकर्षक गोलाकार गडद लाल रंगाचे चमकदार कांदे, २-३ महिन्यापर्यंत साठवणूकीसाठी उत्तम, नैसर्गिकपणे माना पडतात, कांद्याची मान बारीक व खरीपात ९०-१०० दिवसात परिपक्वता.

**१३. अपेक्षित उत्पन्न :** खरीप २०० ते २५० क्विंटल प्रति हेक्टरी व रांगडा २५० ते ३०० क्विंटल प्रति हेक्टरी. वातावरणातील बदलामुळे पीक उत्पादन मध्ये बदल होण्याची शक्यता असते.


## Aadidisha Seeds Pvt. Ltd.

**Official Address :** Plot No. 50, S.N. 49/2A, Lekha Nagar, Ekvira Chowk, Pipeline Road, Ahilyanagar, Maharashtra 414003
**Customer Care No. :** 8055122298 | 8975304910 **Email :** info@aadidishaseeds.com **Website :** www.aadidishaseeds.com